Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 834 – 840

DOI: 10.5281/zenodo.10281123

**Original Research Article**

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रहाचे विचार

प्रा. डॉ. विजया साखरे

इतिहास विभाग, पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, श्री शिवाजी कॉलेज, कंधार, ता. कंधार, जि. नांदेड ४३१७१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vijayasakhare1969@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

म.गांधींजींनी जगाला दिलेली देणगी म्हणून सत्याग्रहाकडे बघितले जाते. सत्याग्रहाला भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. या निःशस्त्र शस्त्राचा वापर करून भारताला स्वातंत्र्य मिळाले. यामुळे म. गांधींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले होते. सत्याग्रहाच्या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्य लढा यशस्वी झाला. यात सर्व गांधी तत्वज्ञान सामाविष्ट झालेले आहे. हिंद स्वराज्य या पुस्तकात ते नमूद करतात की, भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा सत्याग्रहाच्या मार्गाने सुटणार आहे. लोकशाही निर्माण करण्याचा एक मार्ग म्हणून गांधीजी सत्याग्रहाकडे बघितले होते. महात्मा गांधीं यांनी अंगिकारलेली सत्याग्रह ही एक महत्त्वपूर्ण वृत्ती आहे. तिचा उगम राग, लोभ, अनुराग, माया, प्रीती इ. भावनांमध्ये दिसतो. आपलेपणा, आदर, प्रेम, औदार्य हे मानवी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. म. गांधीजींनी जीवनातूनच सत्याग्रहाचा धडा घेतला आणि जीवनातील सर्व समस्यांसाठी सत्याग्रहाचा उपयोग केला.

## सत्याग्रहाचा अर्थ

सत्याग्रह हा शब्द संस्कृत आहे. तो शब्द सत्य आणि आग्रह या दोन शब्दांपासून बनला आहे त्यामुळे सत्याग्रह चा शब्दशः अर्थ सत्याचा आग्रह असा होतो. महात्मा गांधी यांच्या मते, सत्याला चिटकून राहणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याला धरून ठेवणे किंवा सत्य शक्ती, एक विशिष्ट आहे. अहिंसक प्रतिकार किंवा नागरी प्रतिकार म्हणून ओळखले जाते. सत्याग्रह ही संज्ञा महात्मा गांधीजींनी तयार केले आणि विकसित केले. त्यांच्या मते, सत्याग्रह म्हणजे आत्मिक शक्तीच्या जोरावर अन्याय व पिळवणुकीच्या विरोधात केलेला प्रतिकार व प्रत्यक्ष कृती होय. स्वतः कष्ट सहन करून सत्याचे रक्षण

करणे म्हणजे सत्याग्रह. विनोबा भावे म्हणतात की, “सत्याग्रह नकारात्मक नसून सकारात्मक वस्तू आहे. संपूर्ण जीवन सत्याच्या आधारे उभे करण्याची गोष्ट त्यात आहे". भारतीय स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी सत्याग्रह केला. जो सत्याग्रह करतो तो सत्याग्रही असतो. अन्यायाविरुद्ध शांततेने आणि दृढ निश्चयाद्वारे प्रतिकार करण्याचा एक अभिनव, अहिंसक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. प्राचीन भारतीय जैन, बौद्ध आणि पौराणिक साहित्यात यातून सत्याग्रहाची काही उदाहरणे आढळतात. सत्यनिष्ठा, सत्यव्रत, सत्यसंघ या शब्दांचा उल्लेख आढळतो. मात्र सत्याग्रह शब्दाचा अर्थ याहून अधिक व्यापक असा आहे. सत्याग्रहात प्रतिकारासाठी संयम व सहनशीलतेची अत्यंत आवश्यकता असते. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला सत्य व न्याय याची जाणीव करून देणे व त्या व्यक्तीचे मतपरिवर्तन करणे हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट असते. सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीने हिंसा व असत्य याचा वापर करता कामा नये. सत्याग्रहाचा हा मार्ग सामान्य माणसालाही अनुसरता येतो.

म. गांधी यांनी दक्षिण आफ्रिकेतील चळवळीला सविनय प्रतिकार (पॅसिव्ह रेझिस्टन्स) असे म्हणत. पण त्यातून सत्याग्रहाचा संपूर्ण अर्थ व्यक्त होत नाही. म्हणून त्यांनी भारतात आल्यानंतर या शब्दाला समर्पक नाव सुचविण्याविषयी ‘इंडियन ओपिनियन’ या नियतकालिकातून जाहीर आवाहन केले होते. अनेकांनी विविध नावे सुचविली. ती नावे त्यांना आवडली नाही. मगनलाल गांधींनी ‘सदाग्रह’ हे नाव सूचविले. महात्मा गांधीजींनी त्यात किरकोळ बदल करून ‘सत्याग्रह’ असे नाव दिले. सत्यामध्ये शांतीचा अंतर्भाव होतो. सत्याग्रह म्हणजे शांतिमार्गाने बलप्राप्तीचा उपाय, साधन किंवा मार्ग होय. त्यांनी अहिंसक सत्याग्रहाला सामाजिक शक्तीचे रूप देऊन स्वातंत्र्य व स्वतःचे हक्क यांसाठी लढ्याचे एक प्रभावी हत्यार निर्माण केले. त्यांनी सत्याग्रहाला तात्त्विक भूमिकेचे अधिष्ठान दिले. त्याचे संपूर्ण शास्त्र बनविले आहे. केवळ निःशस्त्र प्रतिकार म्हणजे सत्याग्रह नव्हे. सत्याग्रह हे एक जीवन दर्शन आहे. ती एक मूलगामी व सर्वंकष निष्ठा आहे. मनुष्याची सत्प्रवृत्ती व समंजसपणा यांवरील विश्वास हा सत्याग्रहाचा मूलाधार आहे. शुद्ध साध्याकरिता शुद्ध साधनेच उपयुक्त ठरतात. शुद्ध साध्याकरिता अशुद्ध साधने उपयोगात आणल्यास साध्यही अशुद्ध बनते आणि साध्य दूर जाते. म्हणून सत्याग्रह हेच शुद्ध साधन होय. सत्याग्रह म्हणजे सत्याकरिता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे होय. खऱ्या सत्याग्रहीला नैतिक दृष्टया योग्य काय व अयोग्य काय, हे ओळखावे लागते.

**गांधीजींच्या सत्याग्रहाची तत्त्वे**

गांधीजींची सत्याग्रह ही संकल्पना खुप व्यापक आहे. प्रत्येकाने सत्याग्रह शिकवला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी सत्याग्रह शिकवण्यासाठी साबरमती आश्रमाची स्थापना केली होती. महात्मा गांधींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी या तत्त्वांचा अवलंब राजकीय लढ्यासाठी केला. गांधींजींनी सत्याग्रहाच्या खालील तत्त्वांचे पालन करावे असे आवाहन केले आहे.

१. सत्याग्रहात अहिंसेचे पालन केले पाहिजे.

२. सत्याग्रहात प्रामाणिकपणाचा समावेश होतो. न्याय व सत्यावर आधारित पाहिजे

३. सत्याग्रह व्यक्तिगत हितासाठी करायचा नसतो. सार्वजनिक हितासाठी करायचा असतो..

४. सत्याग्रहात प्रतिकार सोबत विधायक कार्याला महत्त्व दिले पाहिजे.

५. विरोधकांना न घाबरता निर्भयपणे सामोरे गेले पाहिजे. अन्याय सहन करण्याची तयारी असावी

६. सत्याग्रह हा सत्य व भरीव स्वरूपाचा असावा. जनमताचा आदर करावा

७. विदेशी वस्तुंचा बहिष्कार व स्वदेशीचा स्वीकार.

८. सत्याग्रहात शिस्तीला महत्त्व आहे

९. पवित्र व त्यागमय जीवन जगले पाहिजे. आपले सर्वस्व गमावण्याची तयारी असले पाहिजे.

१०. सत्याग्रहात खादी परिधान करणे आवश्यक आहे.

११. अल्कोहोल आणि इतर मादक पदार्थांपासून दूर राहणे आवश्यक आहे

१२. आंदोलनात प्रसिद्ध केलेले शिस्तीचे सर्व नियम स्वेच्छेने पार पाडले पाहिजेत

१३. सत्याग्रहामुळे तुरुंगात गेल्यावर तुरुंगाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१४.सत्य आणि अहिंसेवर विश्वास ठेवला पाहिजे.

**सत्याग्रहींसाठीचे नियम**

सत्याग्रहाचा कणा म्हणजे सत्याग्रही. सत्याग्रही म्हणजे सत्याचा स्वीकार करणारा. सत्याग्रहामध्ये सत्यासाठी आग्रह येतो. सत्याग्रही सत्याचे नम्रपणे ग्रहण करतो. सत्यासाठी अन्यायाशी भांडणारी व्यक्ती. कोणत्याही सत्याग्रहाचे यश आणि अपयश हे सत्याग्रहींवर अवलंबून असते. यामुळे सत्याग्रही हा विशिष्ट गुणसंपन्न व प्रशिक्षित असला पाहिजे. म्हणून गांधीजींनी सत्याग्रहींसाठी अनेक नियमांचे पालन करण्यास सांगितले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. राग, संताप करू नये. सत्य, अहिंसा यावर सत्याग्रहींचा विश्वास असावा

२. प्रतिस्पर्ध्याचा राग सहन करावा आणि विरोधकांच्या मतांचा आदर करावा

३. कधीही भितीपोटी हल्ले किंवा शिक्षेचा बदला घेऊ नका.

४. आंदोलनात स्वेच्छेने अटक करून घेण्याची तयारी ठेवणे.

५. मालमत्तेचे विश्वस्त असल्यास त्या मालमत्तेचे अहिंसकपणे रक्षण करा.

६. सत्याग्रही व्यक्ती चारित्र्यसंपन्न असावी.

७. सत्याग्रही हा निष्क्रिय नव्हे तर सक्रिय असला पाहिजे

८. विरोधकांला, विरोधकांच्या ध्वजाला सलाम करू नका किंवा त्यांचा अपमान करू नका.

९. कैदी म्हणून विनम्रपणे वागा आणि तुरुंगाच्या नियमांचे पालन करा.कैदी म्हणून विशेष अनुकूल वागणूक मागू नका.

१०. सविनय कायदेभंग कारवाईच्या नेत्यांच्या आदेशाचे आनंदाने पालन करा

११. तुमच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या सहभागावर तुमचा सहभाग सशर्त करू नका.

१२. जातीय भांडणाचे कारण बनू नका. अशा भांडणात बाजू घेऊ नका. जातीय भांडणांना कारणीभूत ठरणारे प्रसंग टाळा.

१३. धार्मिकांना इजा होईल अशा मिरवणुकांमध्ये भाग घेऊ नका.

१४.संयम आणि निर्भयता हे गुण सत्याग्रहींसाठी आवश्यक आहेत.

सत्याग्रही हा अन्यायाविरुद्ध सत्याने आणि हिंसेविरुद्ध अहिंसाच्या मार्गाने लढत असतो. त्यामुळे त्यांना पराजय माहिती नसतो. सत्याग्रहींमध्ये स्वतंत्र शिस्त, नियंत्रण आणि स्वयं शुद्धीकरण या गोष्टी असाव्या लागतात. सत्याग्रहातून जे मिळविले आहे ते सत्याग्रहाद्वारेच टिकविले पाहिजे, असे म. गांधी यांचे मत होते.

**सत्याग्रहाची साधने**

गांधीजींच्या राजकीय तंत्राचा भाग म्हणून सत्याग्रहाकडे आज संपूर्ण जग पाहाते आहे. अजूनही विस्मयचकित होत आहेत. त्यातील नैतिक अधिष्ठान अनेकांना अजूनही अचंबित करते. या तंत्राने शेकडो निरक्षर, मजूर, शेतकरी, गरिबांना भारून टाकले होते. थोडेही विचलित न होता ते चालत राहिले. त्याच तत्त्वाने पुढे भारताला मुक्ती मिळवून दिली. लोकशाही बळकट केली. महात्मा गांधी यांच्या सत्याग्रहाची साधने पुढील प्रमाणे आहेत.

**असहकार**

सहकार्य करण्यास नकार देणे म्हणजे असहकार होय. कोणत्याही व्यक्ती, समाजाच्या किंवा सत्तेच्या कार्याशी नीती, न्याय या दृष्टीने सहकार्य करणे अयोग्य आहे असे वाटल्यास, त्यांच्या कार्यातून आपले अंग काढून घेऊन त्या कामापासून संपूर्णपणे अलिप्त राहणे म्हणजे असहकार होय. इंग्रज भारतीयांवर अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती करीत होते. सरकारच्या या अन्यायाविरुद्ध जनता विरोध करणार नाही तोपर्यंत हा अत्याचार भारतीयांना अशाच प्रकारचे सहन करावा लागणार आहे. म्हणून जनतेने इंग्रज सरकारशी सहकार्य करणे सोडावे. सरकारने केलेला अन्याय, जुलूम, अत्याचार नष्ट करण्यासाठी असहकार एक प्रभावी माध्यम आहे असे महात्मा गांधी यांचे मत होते. इंग्रजांविरुद्ध हा एकमेव मार्ग आहे. असहकारच इंग्रजी शासनाच्या गुलामगिरीतून भारतीयांची मुक्तता करेल अशी अपेक्षा त्यांना होती. म्हणून म. गांधी इ.स.१९२० मध्ये असहकार आंदोलन सुरू केले. असहकारासाठी आत्मसंयमाची आवश्यकता आहे असे ते म्हणत.

**उपोषण**

उपोषण हा सत्याग्रहाचा चांगला मार्ग आहे, असे म. गांधींजींचे मत होते. आपल्या मागण्या मान्य करवून घेण्यासाठी, निषेध किंवा विरोध व्यक्त करण्यासाठी अन्न न घेण्याची क्रिया म्हणजे उपोषण होय. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधी यांनी अनेकदा उपोषणे केली. उपोषण करून सत्याग्रह करणे हा जनता व सरकारचे लक्ष

वेधण्याचा उत्तम पर्याय आहे, असे त्यांचे मत होते. उपोषण करणाऱ्या व्यक्तीस यातना, कष्ट, सहन करावे लागतात. यामुळे विरोधक आणि जुलूमी राज्यकर्त्यांचे हृदय परिवर्तन घडून येते. म्हणून उपोषणकर्त्यांनी मरेपर्यंत उपोषण करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे महात्मा गांधींचे मत होते.

**सविनय कायदेभंग**

सत्ताधारी आदेशाचे पालन करण्यास अहिंसात्मक मार्गाने नकार देणारी सामूहिक कृती म्हणजे सविनय कायदेभंग होय. या कृतीचा मुख्य उद्देश शासनावर नैतिक दबाव आणणे हा असतो. राज्यकर्ते जनतेवर जुलूम, अन्याय, अत्याचार करीत असतीलतर देशातील जनतेने राज्यकर्त्यांनी लागू केलेले कायदे पाळू नयेत असे महात्मा गांधी यांचे मत होते. सविनय कायदेभंगामध्ये संपूर्ण समाजाचे हित साधले जाते. यात हिंसात्मक मार्ग वर्ज्य असतो. अहिंसेचा मार्ग अवलंबिला जातो. कायदेभंग करीत असताना सरकारकडून होणारे अत्याचार सहन करण्याची शक्ती सत्याग्रही जवळ असणे आवश्यक आहे, असे महात्मा गांधी यांचे मत होते. गांधीजींनी १९३० मध्ये सविनय कायदेभंगाची घोषणा केली. १२ मार्च १९३० रोजी ते साबरमती आश्रमातून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मीठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रहींसह प्रसिद्ध अशी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली होती.

**बहिष्कार**

बहिष्कार हे म. गांधी यांनी सांगितलेले सत्याग्रहाचे एक साधन आहे. परदेशी मालावर बहिष्कार घालणे विशेषत: परदेशी कपडय़ावर बहिष्कार घालणे. मात्र परदेशी कापड विकत घेऊन त्याची होळी करावी. कायदेमंडळावर बहिष्कार घालणे. निवडणुका लढवायच्या नाहीत. मतदान करायचे नाही. सरकारी कार्यालये आणि न्यायालयांवर बहिष्कार टाकायचा. सरकारी शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी–प्राध्यापकांनी जायचे नाही इ. घटकांवर बहिष्कार टाकण्याचा कार्यक्रम त्यात होता. या मार्गाचा अवलंब करून भारतीय जनतेने इंग्रज सरकारला जेरीस आणले होते.

**हरताळ**

हरताळ हे म. गांधी यांनी सांगितलेले सत्याग्रहाचे एक साधन आहे. दैनंदिन व्यवहार बंद करणे, शासकीय कामकाजावर बहिष्कार टाकून सरकारला वठणीवर आणता येते असा विचार म्हणजे हरताळ. महात्मा गांधी यांच्या मते, हरताळ स्वयंस्फूर्तीने असावी. त्यात हिंसा असू नये. अहिंसात्मक मार्गाने केलेली हरताळ हे देशातील जनतेचे प्रभावी साधन आहे. हरताळ मुळे राज्यकर्त्याचे हृदय परिवर्तन होण्यास मदत होते. हरताळ हे जनतेच्या हातातील एक उत्तम सत्याग्रहाचे प्रभावी साधन आहे. जनतेच्या मनातील असंतोष हरताळच्या माध्यमातून व्यक्त करता येतो. म. गांधी यांच्या मते, जनतेने पुन्हा-पुन्हा हरताळ करू नये. कारण असे केल्यास हरताळचे महत्त्व कमी होते. गांधींजींनी रौलेट कायद्याविरुद्ध सत्याग्रह पुकारला. ६ एप्रिल १९१९ मध्ये रौलेट कायद्याला विरोध करण्यासाठी देशव्यापी हरताळ पाळण्याचे आवाहन केले होते.

**संप**

उदयोग-धंद्यातील कामगारांनी सामूहिक विचाराने किंवा एकमताने पूर्णतः, अंशतः काम थांबविण्याचा घेतलेला निर्णय म्हणजे संप होय. संप आपल्या न्याय मागण्या मांडण्यासाठी कामगार व मालक यांच्या हातांतील महत्त्वाचे सत्याग्रहाचे साधने आहे. म. गांधींच्या काळात भारतीय कामगार वर्गात जनजागृती झाली होती. या कामगारांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यासाठी गांधींजींनी सत्याग्रहाचे साधन म्हणून संपाचा वापर करण्यास सुचविले. हा संप अहिंसात्मक मार्गाने करणे अपेक्षित आहे.

**हिजरत किंवा स्थलांतर**

सत्याग्रहाचे शांततामय प्रतिकाराचे सर्व मार्ग बंद झाल्यानंतर अन्यायग्रस्त जनतेने सत्याग्रहाचा शेवटचा मार्ग म्हणजे हिजरत. राज्यकर्त्यांच्या जुलूम, अन्याय, अत्याचारामुळे जीवन जगणे कठीण होत असेल, सरकारकडून वारंवार जुलूम, पिळवणूक होत असेल सरकार विरुद्ध अहिंसा मार्गाने प्रतिकार करणे शक्य होत नसेल त्यावेळी हिंसात्मक मार्गाचा अवलंब न करता अहिंसात्मक मार्गाने तो प्रदेश, प्रांत सोडून त्या भागाचा त्याग करणे म्हणजे हिजरत होय. बारडोली, जुनागढ येथील लोकांना हिजरत चा सल्ला म. गांधींजींनी दिला होता.

**समारोप**

गांधीजींनी सत्याग्रहाचा केवळ सिद्धांत मांडला नाही तर स्वत: त्याचे आचरण केले. कार्यकर्त्यानाही त्याचे धडे दिले. शेकडो लोक हिंसेचा अवलंब न करता ब्रिटिशांचा अत्याचार सोसत होते. हे संपूर्ण जगाने पाहिले. या तत्त्वाचा खूप मोठा आदर जगभर झाला. या काळात जगभर हिंसक क्रांत्या होत होत्या. कालांतराने जगाने स्तुती केवळ गांधी तत्त्वांचीच केलेली आहे. भारताला जगभर प्रतिष्ठा मिळवून दिली. अहिंसा व सत्याचा गांधींजींचा सिद्धांत राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठ्या निष्ठेने आणला होता. त्याला ते सत्याग्रह असे म्हणतात. शुद्ध साध्याकरिता शुद्ध साधनेच उपयोगी पडते. शुद्ध साध्याकरिता अशुद्ध साधने वापरल्यास साध्यही अशुद्ध बनते. साध्य दूर जाते. सत्याग्रह हाच शुद्ध साधन होय. सत्याग्रह म्हणजे सत्याकरिता अहिंसेच्या मार्गाने असत्याचा प्रतिकार करणे. त्यांची शरीरक्लेश सहन करण्याची शक्ती हा आत्मशक्तीचा एक भाग आहे. कित्येक वेळा शरीरक्लेश सहन करून प्रतिकार करणारा प्रतिपक्षावर जबरदस्तीही करू शकतो. त्याचा आग्रह अविवेकीही असू शकतो. त्याची सत्याची कल्पना चुकीचीही असू शकते. म्हणून खऱ्या सत्याग्रहीला नैतिक दृष्ट्या अयोग्य काय व योग्य काय हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पतकरावी लागते आणि आपल्या प्रतिकाराच्या उद्देशात असत्य दिसल्यास माघार घेण्याची तयारीही असावी लागते. माघार घेण्याकरितासुद्धा धैर्य लागते. निःशस्त्र प्रतिकारसुद्धा हिंसात्मक म्हणजे जबरदस्ती करणारा असतो. त्यात अत्याचारही असतो. सत्य हे तत्त्वतः शत्रूलाही मान्य असावे लागते.

महात्मा गांधी यांनी जगाला दिलेली देणगी म्हणून सत्याग्रहाकडे बघितले जाते. सत्य व अहिंसेच्या साहाय्याने विरोधकांशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह. जागतिक पातळीवर विविध देशांमध्ये सत्याग्रहाचे प्रयोग झाले आहेत.

यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो म्हणजे नेल्सन मंडेला यांच्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा अनेक भारतीयांनी आपल्या आंदोलनामध्ये म. गांधी यांच्या सत्याग्रहाच्या तत्त्वांचा अवलंब केला आहे. मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून महाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांमध्ये सरकारी यंत्रणेला जागे करून सामान्य लोकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले आहे. अण्णा हजारे यांनी सुद्धा विविध आंदोलनामध्ये सत्याग्रहाचा उपयोग केला आहे. यावरून म.गांधींची सत्याग्रहाची संकल्पना संपूर्ण मानव जातीसाठी खूप मोठी उपलब्धी आहे. यात सत्याग्रहाची तत्त्वे आणि या तत्त्वांचा पुरस्कार करणारे सत्याग्रही यांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. महात्मा गांधी सत्याग्रह संदर्भात नमूद करतात की, "सत्याग्रह ही गुरुकिल्ली आहे. कारागिर एक प्रकारची किल्ली बनवितात. ती सर्व प्रकारच्या कुलूपांना चालते. ते तिला मास्टर की म्हणतात. तसेच सत्याग्रह ही आपल्या अगणित आपत्तींवरील गुरूकिल्ली आहे". त्यामुळे भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर सुद्धा समकालीन विविध समस्यांवर सत्याग्रह हा एक उपाय आहे यात शंका नाही.

**संदर्भग्रंथ सूची**


१. बेडकिहाळ किशोर, (संपा.), (२०१३), परिवर्तन विचार : चिंतन आणि चिकित्सा – वसंत पळशीकर ह्यांचे निवडक लेख, लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई

२. पुंडे द. दि., (संपा.), (१९९५), गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे

३. नेमाडे भालचंद्र, (संपा.), (१९९९), साने गुरुजी पुनर्मूल्यांकन, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.

४. मोरे सदानंद, (२००७), लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे

५. बेडहिकाळे किशोर (संपा.), (२०२२), गांधी : जीवन आणि कार्य, साधना प्रकाशन, पुणे.

६. बेल्हेकर एन. के. (अनु.), (२००३), आधुनिक भारताचा इतिहास: एक नवीन मूल्यांकन, एस.चंद आणि कं.,दिल्ली.

७. कठारे अनिल, (२०१८), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास कल्पना प्रकाशन, नांदेड

८. टाक ओमप्रकाश, (२००८), आधुनिक भारतीय चिंतन, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर.

९. Pagar Amol, Kadam Arvind (Ed.), (2020), Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ), PEER REVIEWED & INDEXED JOURNAL, ISSN-2349-638x, Special Issue No.69, Impact Factor - 6.293,

१०. Sirswal Desh Raj (Ed.), (2019), Lakayata, Journal of Positive Philosophy, ISSN 2249-8389, Special Issue on ‘The Philosophy of Mahatma Gandhi’, Vol. X, No.02.

११. शिखरे दा.न., महात्मा गांधी गौरव ग्रंथ, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे.

१२. साखरे विजया, (२०१३), भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर.